खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### हर घर तिरंगा उपक्रम

**पुढारी**

# क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

असंख्य क्रांतिकारकांच्या आत्मबलिदानातून स्वातंत्र्याचा सूर्य पाहण्याचे भाग्य भारतवासीयांना लाभले आहे. विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचे स्मरण ठेवून निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट होण्याचे स्वप्न बाळगावे आणि सत्यात उतरवावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

खेड तालुका महसूल विभाग व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियान राबविले. महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १२) आयोजित कार्यक्रमात बुट्टे पाटील बोलत होते.

**ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे आवाहन**

खेडच्या तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे, संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, संजय शिंदे, मंडलाधिकारी सविता घुमटकर आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲप चित्ररथाचे उद्घाटन, सुमारे ६ हजार राष्ट्रध्वजांचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन या वेळी करण्यात आले.

तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे यांनी देशाला घडविण्यात अनेकांचे योगदान असून, विद्यार्थ्यांनी त्याची जाणीव ठेवून भारत उन्नत व प्रगत देश होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे पवित्र कार्य केले पाहिजे, असे सांगितले.

My Gramin Edition
Aug 15, 2022 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवा : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : असंख्य क्रांतिकारकांच्या आत्मबलिदानातून स्वातंत्र्याचा सूर्य पाहण्याचे भाग्य भारतवासीयांना लाभले असून विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचे स्मरण ठेवून निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट होण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

ते महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे, संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, संजय शिंदे, मंडलाधिकारी सविता घुमटकर, तलाठी बबन लंघे, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ई- पीक पाहणी मोबाईल ॲप चित्ररथाचे उद्घाटन, सुमारे ६ हजार राष्ट्रध्वजांचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे म्हणाल्या की, भारताने नेत्रदीपक प्रगती केली आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी, सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. डी.व्ही. बोऱ्हाडे यांनी तर आभार प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 2 Aug 13, 2022
Powered by: erelego.com



केसरी

: www.dailykesari.com

# क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवावे : देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरूनगर, (वार्ताहर) : असंख्य क्रांतिकारकांच्या आत्मबलिदानातून स्वातंत्र्याचा सूर्य पाहण्याचे भाग्य भारतवासियांना लाभले असून विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचे स्मरण ठेऊन निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट होण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे, संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, संजय शिंदे, मंडलाधिकारी सविता घुमटकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिगळे, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रा. उमेश जगताप, प्रबंधक कैलास पाचारणे व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ई- पीक पाहणी मोबाईल प चित्ररथाचे उद्घाटन, सुमारे सहा हजार राष्ट्रध्वजांचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे म्हणाल्या की भारताने मागील ७५ वर्षात सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. भारताचा प्रवास अविकसित देशाकडून प्रगत देश असा झाला आहे. या देशाला घडविण्यात अनेकांचे योगदान असून विद्यार्थ्यांनी त्याची जाणीव ठेवून भारत उन्नत व प्रगत देश होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. महसूल विभागाचे प्रशासन लोकाभिमुख करण्याकडे शासनाचा कल असून ही ई-सातबारा, ई-पीक पाहणी, उत्पन्नाचा व जातीच्या दाखल्याचे महावितरण केंद्राच्या माध्यमातून विकेंद्रीकरण, नवमतदार नोंदणी अभियान राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. डी.व्ही. बोऱ्हाडे यांनी केले. आभार प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी मानले.



# क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवावे

राजगुरुनगर (दै. संध्या) :

■ ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

असंख्य क्रांतिकारकांच्या आत्मबलिदानातून स्वातंत्र्याचा सूर्य पाहण्याचे भाग्य भारतवासियांना लाभले असून विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचे स्मरण ठेऊन निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट होण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा ' अभियानाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे, संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, संजय शिंदे, मंडलाधिकारी सविता पुष्टकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रा. उमेश जगताप, प्रबंधक कैलास पाचारणे व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ई– पीक पाहणी मोबाईल प चित्ररथाचे उद्घाटन, सुमारे सहा हजार राष्ट्रध्वजांचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे म्हणाल्या की भारताने मागील ७५ वर्षात सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. भारताचा प्रवास अविकसित देशाकडून प्रगत देश असा झाला आहे. या देशाला घडविण्यात अनेकांचे योगदान असून विद्यार्थ्यांनी त्याची जाणीव ठेवून भारत उन्नत व प्रगत देश होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

महसूल विभागाचे प्रशासन लोकाभिमुख करण्याकडे शासनाचा कल असून ही ई– सातबारा, ई–पीक पाहणी, उत्पन्नाचा व जातीच्या दाखल्याचे महावितरण केंद्राच्या माध्यमातून विकेंद्रीकरण, नवमतदार नोंदणी अभियान राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी , सूत्रसंचालन प्रा. एम. एन. मुठ्ठक, प्रा. डी.व्ही. बोऱ्हाडे यांनी तर आभार प्रा.व्ही.बी. दौंडकर यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख